# क्रांतिकारी चळवळीतील वासुदेव बळवंत फडके यांच्या कार्याचा ऐतिहासिक अभ्यास

**प्रा. डॉ. नाईक एन.डी.**
एस.बी.एस कॉलेज, कराड

**प्रस्तावना -**

इ.स १८५७ मध्ये भारतीय जनतेचे ब्रिटिश राजवटीच्या विरोधात सशस्त्र उठाव केला. हाच उठाव भारताचे पहिले स्वातंत्र्ययुद्ध म्हणून ओळखले जाते. हा उठाव ब्रिटिश सरकारने निर्दयीपणे मोडून काढला ज्यामुळे ब्रिटीश सरकारला संघटितपणे सशस्त्र लढा देण्याशिवाय पर्याय नाही ही गोष्ट भारतीयांच्या लक्षात आली इ च्या १८५७ स उठावातील अपयशाने देशात नैराश्य निर्माण झाले असले तरी ब्रिटिशांच्या विरोधात सशस्त्र उठाव चालूच राहिले. यामध्ये महाराष्ट्रातील वासुदेव बळवंत फडके यांचे बंड हे महाराष्ट्रात सुरुवातीच्या कालखंडातील बंड होय म्हणून त्यांना आद्य क्रांतिकारक म्हणून देखील संबोधले जाते. त्याकरिता त्यांनी ब्राह्मण, रामोशी, कोळी, मांग, महार, मुसलमान असे जवळजवळ ३०० कार्यकर्ते एकत्र आले. त्यांच्या कार्याचा आढावा घेणे हा या शोधनिबंधाचा मुख्य उद्देश होय.

**शोध निबंधाचे उद्देश -**

१) वासुदेव बळवंत फडके यांच्या कार्याचा आढावा घेणे.

२) वासुदेव बळवंत फडके यांचे क्रांतिकारी चळवळीतील योगदानाचा परामर्ष घेणे.

शिरढोणमधील वासुदेव बळवंत फडके या तरुणाने रामोशी, कोळी, मांग, महार, मुसलमान या जमातीतील सहकार्यांच्या मार्फत सशस्त्र क्रांतीचा लढा दिला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यापासून त्यांनी प्रेरणा घेतली होती त्यांना इंग्लंडमधील वस्तूची चीड होती त्यांनी ऐक्यवर्धिनी नावाची संस्था स्थापन करून जनहिताचे कार्य केले. पश्चिम महाराष्ट्रात फडकेंची मोठी दहशत निर्माण झाली. फडकेंनी क्रांतिकारकांचे सशस्त्र गट तयार करून त्यांच्याद्वारे दळणवळणाचे मार्ग उद्ध्वस्त करणे, फोनच्या तारा तोडणे, कारागृहांवर हल्ला करून कैद्यांना मुक्त करणे, सरकारी खजिना लुटणे असा उठाव सुरू केला. क्रांतीच्या भावनेने प्रेरित झालेल्या वासुदेव बळवंत यांनी ३०० ब्राह्मण, कुणबी, रामोशी, धनगर, कोळी, महार, मुसलमान या सहकार्यांच्या मदतीने पुण्याच्या परिसरात राष्ट्रीय कामासाठी दरोडे घालण्याचा २० फेब्रुवारी १८७९ पासून प्रारंभ केला फडकेंनी ब्रिटिशांविरुद्ध क्रांती युद्ध पुकारले.1

त्यांनी दौलतराव नाईक यांच्या मदतीने पुण्याजवळ धामारी गावावर पहिला दरोडा टाकला. यामध्ये फक्त तीन हजार रुपये मिळाले २५ ते २७ फेब्रुवारी १८७९ रोजी लोणी व खेड या गावांवर दरोडा टाकून लूटमार केली यानंतर दरोड्यांची मालिका सुरु केली. सरकार व रयत चक्रावून गेली, फडक्यांच्या वेशभूषेमुळे त्यांचे साथीदार त्यांना महाराज म्हणत त्यामुळे कोणी महाराज या दरोड्यांमागे आहेत अशा बातम्या पसरल्या. अशाप्रकारे ब्रिटिशांविरुद्ध क्रांती युद्ध पुकारले आणि ते सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात भटकत राहिले.2

वासुदेव बळवंत फडक्यांनी मग महाराष्ट्रातील तथाकथित मागासलेल्या जातींमध्ये मदत घेण्याचे ठरवले. रामोशी, मातंग, कोळी, धनगर आणि इतर समाजातून त्यांनी तरुण घेतले व त्यांना शस्त्रास्त्रांचे प्रशिक्षण देउन आपल्या सैन्यात भरती केले, अशा शेकडो सैनिकांसह त्यांनी इंग्रज सरकारविरुद्ध अधिकृतरीत्या युद्धाची घोषणा केली. पुण्याजवळील शिरूर आणि खेड तालुक्यातील सरकारी खजिन्यावर धाड टाकून फडक्यांनी सैन्याचा चरितार्थ चालवला. त्यानंतर त्यांनी थेट पुण्यावर चाल केली आणि काही दिवसाकरता शहरावर कब्जा मिळवला. एकाच वेळी अनेक ठिकाणी हल्ला चढवून इंग्रज सरकारचे लक्ष विकेंद्रित करण्याचा त्यांच्या चालिला यश मिळाले नाही आणि इंग्रज सरकारने भारतातील हा पहिला सशस्त्र उठाव चिरडण्याचा चंग बोधला, धानुर गावाजवळ झालेल्या हातघाईच्या लढाईनंतर त्यांनी वासुदेव फडकेंना पकडून देणाऱ्यास मोठे बक्षीस देण्याचे घोषित केले. तशी पत्रकेसुद्धा ठिकठिकाणी वाटण्यात आली. मुंबईचे गव्हर्नर रिचर्ड टेंपल यांनी ही घोषित केले की जो कोणी वासुदेव फडके यांचे शीर कापून आणेल त्यास सरकारने जाहीर केलेल्या बक्षीसापेक्षा दीडपट बक्षीस दिले जाईल. पुणे येथील दोन

कार्यालयांना १३ मे १८७९ रोजी आग लावण्यात आल्या तेव्हा हे तेव्हा हे वासुदेवन चे काम असून ते पुण्यात आल्याचा संशय सरकारला आल्यामुळे त्यांनी अनेक नेत्यांचा घराच्या झडत्या घेतल्या. शेवटी वासुदेव फडके यांना पकडण्यासाठी विल्यम डॅनियल या अधिकाऱ्यांनी पिच्छा पुरवला फडक्यानी एक जाहीरनामा प्रसिद्ध केला. मुंबई प्रांताच्या गर्व्हनरचे मुंडके आणून देणाऱ्यास १००० रुपयांचे बक्षीस जाहीर केले. त्या घोषणापत्रामध्ये असाही उल्लेख आहे की आपण जे करत आहोत ते इंग्रज सरकारच्या विरुद्ध आहे. सरकारने केलेली येथील लोकांच्या संपत्तीची लूट, दुष्काळामुळे झालेली दुर्दशा करांचे वाढते प्रमाण, ब्रिटिश अधिकाऱ्यांचे लठ्ठ पगार यावर टीकेची झोड उठवून महाराष्ट्राच्या बिकट आर्थिक स्थितीचे विदारक वर्णन करून सरकार जनतेच्या हिताकडे दुर्लक्ष करत आहे. आतापर्यंत फक्त येथील श्रीमंत लोकांविरुद्ध चाललेली आमची मोहीम आम्ही युरोपियनांविरुद्धही सुरू करू युरोपियनांची सापडेल तेथे कत्तल करू आणि दुसरे बंड १८५७ च्या बंडासारखे उर्फ करू असे जाहीर केले.3

ब्रिटिश पोलिसांचा ससेमिरा सुकविण्यासाठी वासुदेव बळवंत फडके आणि त्यांच्या इतर सहकाऱ्यांना अटक करण्याच्या कामी मेजर डॅनिअलने प्रयत्नाची पराकाष्टा चालवली. वसुदेवानी गाणगापूरला राहिले, संन्यासी व रामोशी असे मिळून एकूण १०० सशस्त्र लोक उठावासाठी तयार केले होते. परंतु दुर्दैवाने मेजर डॅनिअयला वासुदेव गाणगापूरला असल्याची माहिती मिळाली.4 निजाम सरकारचा पोलीस कमिशनर अब्दुल हकच्या मदतीने दि २१ जुलै १८७९ रोजी सोमवारच्या पहाटे तीन वाजता एका मंदिरात तापाने फणफणलेले फडके डैनियलच्या हाती लागले व त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला भरण्यात आला. फडकेंच्या वतीने सार्वजनिक काकांनी व नंतर सत्र न्यायालयात महादेव चिमणाजी आपटे या वकिलांनी खटला लढवला. परंतु ब्रिटिश न्यायालयाने वासुदेव बळवंत फडके यांना जन्मठेप आणि काळ्यापाण्याची शिक्षा ७ नोव्हेंबर१८७९ रोजी ठोठावण्यात आली . एडनच्या भयानक कारावासात ते १७ फेब्रुवारी १८८३ ला मरण पावले.5

२४ जानेवारी १९६२ रोजी लॉर्ड माऊंटबॅटन हे लंडनमधील टिळकहाऊसच्या नामकरण समारंभात म्हणाले" हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्याची चळवळ वासुदेव बळवंतांनीच सुरू केली तें क्रांतिकारकांना आणि देशभक्तांना स्फूर्ती देणारे राष्ट्रपुरुष ठरले म्हणून त्यांना भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे आद्य क्रांतिकारक असे म्हणतात.

**सारांश -**

वासुदेव बळवंत फडके यांनी ब्रिटीश सरकारविरुद्ध स्वातंत्र्यासाठी जो सशस्त्र लढा 'दिला तो एकाकी होता. त्यांना पुरेसे अनुयायी लाभले नाहीत व शस्त्रसामग्रीही मिळाली नाही. तथापि भारतात त्यांनी पहिल्यांदाच सशस्त्र लढयाची मुहूर्तमेढ रोवली. ही सशस्त्र उठावाची चळवळ विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात देशभर पसरली, म्हणून त्यांना राष्ट्रवादाचे जनक म्हणतात.

**संदर्भसूची -**

१) डॉ. बी. एन. सरदेसाई, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, फडके प्रकाशन कोल्हापूर २००१ पृष्ट, ९३

२) डॉ. भूषण फडतरे, महाराष्ट्रातील स्वातंत्र्य चळवळ, सक्सेस पब्लिकेशन पुणे, २०१५. पृष्ट १३१

३) प्रा. जितेंद्र भामरे, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, शेठ प्रकाशन, मुंबई- २०१५. पृष्ट, ८६

४) डॉ अनिल कठारे, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, २००२ पृष्ट,३१

५) डॉ. भिडे गजानन, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद २००६ पृष्ट १२६